दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ● संपादक : अजय भांगे ● उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२५ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 25 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 239 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

## पाठपुराव्यातील चिकाटी पाहून केंद्रीय मंत्री गडकरींनी थोपटली पाठ, रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडून मागण्यासंदर्भात सकारात्मकता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली.





दि.२४ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. यावेळी शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. माजलगाव-केज बिटमधील नादुरुस्त भागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत निर्देश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडीसावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज-कळंब मधील मांजरा नदीवरील पुलाच्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण-पंढरपूर रस्ता व अहमदपूर-मांजरसुंबा-पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यात व प्रस्तावित अतिरिक्त बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर-बीड-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डानपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या. याच वेळी 'तुमचा बीड जिल्ह्याच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे', अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा.सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी, आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकतेच्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित निर्गमित करणे, बीड-आहिल्यानगर-सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यांसदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

### सादोळाकरांची माणगी केंद्रीय मंत्र्यांपुढे मांडली

**शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गमधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथे पुल आणि रस्त्याचे काम अपुर्ण आहे. याठिकाणी जमीनीवरूनही वादविवाद निर्माण झालेले आहेत. यामुळे काम अपूर्ण असून यावर योग्य तो मार्ग काढून तेथील काम पूर्ण करावे, यासाठी मागील काही दिवसांपुर्वी सादोळाकरांनी उपोषण केले होते. यानंतर दि.२४ जुलै रोजी खा.सोनवणे यांनी सादोळाकरांचा प्रश्न थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापुढ ठेवला. रस्त्यासंदर्भात जनभावना लक्षात घेवून तो प्रश्न तातडीने सोडवू, असे मंत्री गडकरी म्हणाले.**

**बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महामार्ग, रेल्वेचे कामे होणे अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्रीय मंत्री गडकरीसाहेब यांनी वैयक्तिक लक्ष देतो, असा शब्द दिला आहे. तर रेल्वेमंत्र्यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी लवकरात लवकर होण्यासाठी माझ्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जाईल.
- खा.बजरंग सोनवणे, बीड मतदारसंघ.**

# आवादा पवन ऊर्जा कंपनीच्या विरोधात आमरण उपोषण

**केज । गौतम बचुटे**

आवादा कंपनीचे अधिकारी हे पूर्वीच्या सर्वेक्षणानुसार वीजेचे खांब शेतात बसवीत नसून त्यांचे अधिकारी शेतकऱ्यांना दमदाटी करीत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. या मागाण्यासाठी केज तहसील कार्यालया समोर शेतकरी आणि महिला आमरण उपोषणाला बसल्या आहेत.



या बाबतची माहिती अशी की, दि. २४ जुलै रोजी केज तहसील कार्यालया समोर केज शेतकरी व महिला आमरण उपोषणाला बसल्या आहेत. त्यांनी निवेदनाद्वारे अशी मागणी केली आहे की, केज शिवारातील सर्वे नंबर ७६ मध्ये त्यांच्या शेत जमिनी आहेत. त्यांच्या जमिनीमध्ये त्यांची पत्र्याची घरे आहेत. त्या जागेत आवादा पवन ऊर्जा कंपनी यांनी पूर्वीच्या सर्वे प्रमाणे विद्युत पोल न बसवता गावगुंडांना हाताशी धरून शेतात जबरदस्तीने पोल उभे करीत आहेत. त्या शेतकऱ्यांना सिद्धेश्वर पाटील, संदीप खेत्रे व अमोल पाटील या तिघांनी त्या शेतकऱ्यांना दमदाटी करून धमकी दिली आहे.

या बाबत शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाला निवेदनाद्वारे कळविले आहे. मात्र आवादा कंपनीचे लोक पुन्हा सर्वे नंबर ७६ मधील शेतकऱ्यांना दमदाटी करून त्रास देत आहेत. तसेच पूर्वीची झालेल्या सर्वे प्रमाणे काम करत नाहीत त्यामुळे शेतात राहत असलेल्या महिला व शेतकरी भयभीत झाले आहेत. हे काम तत्काळ बंद करण्याच्या मागणीसाठी केज तहसील कार्यालया समोर रेणूका तेलंग, संगिता तेलंग, साविता भोसले, स्वाती भोसले, कमल वळसे, मीरा थोरात, मेघराज भोसले, सुर्यकांत तेलंग, गोरख थोरात, अशोक भोसले, संतराम भोसले, मारुती भोसले, पांडूरंग भोसले, बलभीम तेलंग हे उपोषणाला बसले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संघटनेच्या अध्यक्षपदी यशवंत गायके

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

किल्लेधारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांची बैठक होवून यात संघटनेची कार्यकारिणी निवडण्यात आली. यात सर्वानुमते अध्यक्ष पदी यशवंत गायके तर उपाध्यक्ष पदी सय्यद शाकेर, कार्याध्यक्ष म्हणून सुरेश शेळके तर सचिव म्हणून तुकाराम शिनगारे यांची निवड करण्यात आली.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांनी दि.२३ बुधवारी बैठक घेवून व्यापारीबंधूच्या विविध समस्या व व्यापार वृध्दीच्या हेतून संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संघटनेची पहिली कार्यकारिणीची सर्वानुमते घोषित करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून माजी नगरसेवक यशवंत गायके, उपाध्यक्ष म्हणून पत्रकार



सय्यद शाकेर, कार्याध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेळके, सचिव म्हणून उद्योजक तुकाराम शिनगारे, कोषाध्यक्ष म्हणून नागनाथ गायके, सहसचिव म्हणून सुनिल खिल्लारे, सहकोषाध्यक्ष म्हणून प्रवीण धोतरे, सल्लागार म्हणून हनुमंत अंधारे, नितिन भैरे, दयानंद इंदुरकर यांची निवड करण्यात आली. बैठक कमलाकर इंदुरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरात बोगस, निकृष्ट दर्जाचे सोलार पोल व हायमास्ट दिवे बसवलेल्या कामाचे बिल देऊ नये-अक्षय कोकाटे

**बीड । प्रतिनिधी**

सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान व दलित वस्ती योजने मधुन शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट-दिवे बसविणाऱ्या कन्स्ट्रक्शन कंपनीकडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरुन साहित्य खरेदीत भष्ट्राचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबवा असे लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी त्यांना निवेदनाद्वारे रिपाई चे नेते अक्षय कोकाटे यांनी मागणी केली आहे.

बीड न.प. च्या वतीने नगरोत्थान महाअभियानातंतर्गत व दलित वस्ती अंतर्गत बीड शहरात सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख ४३ हजार रुपयाची मान्यता देण्यात आलेली आहे. व दलीत वस्ती मधील ६ प्रभागात सोलार पोल हायमास्ट दिवे व विद्युत साहित्य बसविण्याची १ कोटी रुपयाची मान्यता दिलेली आहे.य मा. मुख्याधिकारी न.प.बीड व न.प. अभियंता उदय ई-पिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल्स यांच्या एजन्सीकडून १ कोटी रुपायाचे सोलार पोल व हायमास्ट बसविण्याचे काम करण्यात आलेले आहे. नगरोत्थान अभियानातुन ५ कोटी २५ लाख ४३ हजार रुपयाचे काम साबेर कन्स्ट्रक्शन पाटोदा यांच्याकडून करण्यात आलेले आहे. सदरील कामातील दलित वस्ती अंतर्गत बसविण्यात आलेले सोलार पोलची किमत ७० ते ७५ हजार



असर्ताना या सोलार पोलची किमत २ लाख २१ हजार ९८ रु. दाखविण्यात आलेली आहे. नगरोत्थान अभियाना अंतर्गत साबेर कन्स्ट्रक्शन पाटोदा यांच्याकडून बीड शहरात बसविण्यात आलेल्या सोलार पोलची किमत ६० ते ६५ हजार रुपये असून त्याची किंमत २ लाख ३ हजार ८०० रु. इतकी दाखविण्यात आलेली आहे. सदरील साहित्य खडख मार्क असलेल्या कंपनीची साहित्य न वापरता चायना कंपनीचे साहित्य ज्याला मान्यता नाही असे वापरले आहे. काम करणाऱ्या दोन्ही एजन्सी कडून भष्ट्राचार करण्यात आला असून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन न.प. मुख्याधिकारी बीड यांच्या संगनमताने करण्यात आला आहे. या भष्ट्राचार प्रकरणी काम करणाऱ्या संबंधित एजन्सीची चौकशी करण्यात यावी या करीता दि. २८ फेब्रुवारी २०२५ ते १३ मार्च २०२५ रोजी चौकाशी करुन त्याचे देयक थांबविण्यात यावे. या करीता निवेदन देण्यात आले होते. संबंधिताची चौकशी न करता त्याचे देयक देण्यात आले आहेत. यामध्ये बीड न.प.सी.ओ नीता अंधारे, अभियंता व एजन्सीची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# ना.पंकजाताई यांच्या वाढदिवसा निमित्त कॅन्सर रोगनिदान शिबीर

**बीड । प्रतिनिधी**

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहरात सामाजिक सेवा उपक्रमात कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे. या शिबिराचा गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा परळी शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.



पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रविवार, दि २७ जुलै रोजी कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास संभाजीनगर चे तज्ञ डॉ. शैलेश अग्रवाल तोंड व घसा कर्करोग तपासणी करून निदान करणार आहेत. डॉ.शैलेश अग्रवाल हे मराठवाड्यातील तज्ञ डॉक्टर आहेत. हजारों कर्करोगग्रस्त रुग्णांवर त्यांनी उपचार केले आहेत. डॉ.शैलेश अग्रवाल यांच्या बरोबरच या शिबिरास रेडिएशन कर्करोग तज्ञ डॉ. उत्पल गायकवाड व मेडिकल ऑनकोलॉजिस्ट डॉ केतन शिरसाट तपासणी करणार आहेत. वेदांत होमिओ क्लिनिक, नाथ रोड, औद्योगिक वसाहत येथे रविवार, २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११नेते ३ वाजेपर्यंत कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे.

तोंड आणि जिभेवर दीर्घकाळ टिकणारे फोड, डाग, आवाज बदल, थायरॉईड नोड्युल, अन्न गिळण्यात अडचण व वेदना, तंबाखू गुटख्यामुळे तोंड कमी उघडणे, तोंडातून रक्त येणे तसेच भरून न येणारी जखम, अचानक कमी होणारे वजन, शरीरावर आलेली गाठ, सततचा ताप, थकवा, भूक न लागणे असे लक्षणे असणाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

## संपादकीय..

# निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्यांच्या व्यथा



एखाद्या नोकरदार कर्मचाऱ्याची जीवनाची साधी आखणी काय असू शकते, इमाने इतबारे, प्रामाणिकपणे नोकरी करावी घर प्रपंच सांभाळावा आणि निवृत्ती जीवन आपल्या कुटुंबासमवेत व्यतीत करावे. जर स्वाभिमानाने जगायचे असेल तर नोकरी दरम्यान येणारी रक्कम थोडी बाजूला काढावी व ती रक्कम चांगल्या ठिकाणी गुंतवून त्यावर आपल्या आयुष्याचा शेवटचा क्षण कोणाचाही आधार न घेता व्यतीत करावा मग या पैशाच्या जोरावर आयुष्याच्या शेवटच्या क्षणी कोणापुढे हात पाय पसरू लागू नयेत हाच त्याचा एक उद्देश असतो. मात्र जर हाच शेवटचा पैसा त्याच्या हाती राहिला नाही, तर त्याची काय अवस्था होत असेल याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सध्या निवृत्तीनंतर नरकयातना भोगत असलेले बेस्ट कर्मचारी होय.

एकेकाळी बेस्टमध्ये नोकरी म्हणजे एक सुवर्णकाळ होता आणि तो भोगलाही मात्र आज निवृत्तीनंतरचे जीवन म्हणजे याच बेस्ट कर्मचाऱ्यांच्या नशिबी हे कोणत्या जन्माचे पाप असे म्हणण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कारण आपल्याच पैशासाठी निवृत्तीनंतर करावयास लागणारा संघर्ष त्यांच्या वाटेला येत आहे. कारण सध्या बेस्टची आर्थिक अवस्था डगमगीत झाल्यामुळे बेस्टकडे निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे देणे देण्यासाठी पैसा नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात एकीकडे कर्मचारी निवृत्त होत असताना दुसरीकडे मात्र त्याच कर्मचाऱ्यांना आपल्याच पैशासाठी दारोदारी भटकावे लागत आहे. ज्या आस्थापनाने त्यांचे जीवन घडवले त्यांना भरभरून दिले त्यांचा संसार उभा केला त्याच आस्थापनांविरुद्ध त्यांना नाईलाजाने न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागत आहेत.त्यामुळे कित्येक जणांची निवृत्तीनंतर मानसिक अवस्था बिघडत आहे तर कित्येक जणांचे जगणे आता मुश्किल होऊन बसले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या या बरबादतेला जबाबदार कोण असा प्रश्न कर्मचाऱ्यांकडून विचारला जात आहे. बेस्ट उपक्रमातून २०२२ पासून ते आज २०२५पर्यंत जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांची आजपर्यंतची ग्रॅज्युएटीची अथवा अंतिम देयाची कोणतीही रक्कम कर्मचाऱ्यांना मिळालेली नाही ग्रॅज्युएटी कायदा १९७२ अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला व अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर तीस दिवसांच्या कालावधीत ग्रॅज्युटी रक्कम अदा करणे बेस्ट उपक्रमास बंधनकारक होते आणि यापूर्वी ती रक्कम देण्यात येत होती; परंतु गेली तीन वर्षे सदर रक्कम बेस्ट उपक्रमांकडून आजपर्यंत अदा करण्यात आलेली नाही.यामध्ये झालेला विलंब हा अन्यायकारक असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर मानसिक व आर्थिक ताण निर्माण करणारा ठरत आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या या खूपच गंभीर होत चालल्या आहेत. निवृत्ती पक्षात कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि वयोपरत्वे येणारे आजार, यांना सामोरे जाण्यासाठी निवृत्ती लाभाशिवाय इतर कोणताही पर्याय कर्मचाऱ्यांकडे नसतो.या वयात वैद्यकीय मदत आणि योग्य पोषण ही दीर्घ निवृत्ती जीवनाची पुंजी असते; परंतु बेस्ट उपक्रमाच्या आर्थिक गैरवस्थापनामुळे गलथनपणामुळे या वयात हे सर्व लोक केवळ स्वतःचे पोषण करू शकत नाहीत तर, काही जणांकडे त्याच्याकडे औषधांवर खर्च करण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नाही. ते आयुष्याच्या अशा टप्प्यावर आहेत जेव्हा त्यांच्या शरीराला वैद्यकीय मदत आणि उपचारांची आवश्यकता भासत आहे. काहींना स्वतःचे घर घ्यायचे आहे, मुलांची लग्न करायचे आहेत, काहींनी सेवेत असताना कर्ज घेतले ते फेडायचे आहे, अशा अनेक कारणांसाठी रक्कम मिळणे निकडीचे बनले आहे. त्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळवण्यासाठी जास्त काळ वाट पाहण्यास लावणे हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे ठरत आहे.अधिकारी व कर्मचारी यांची निवृत्ती लाभ हे बक्षीस नसून म्हातारपणातील एक पुंजी मानली जाते. या व्यक्तीला निवृत्तीवेतन देण्याची आणि निधी उभारण्याची नैतिक जबाबदारी ही बेस्ट प्रशासनाची आहे. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाचे प्रशासन त्यांच्या सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांची कायदेशीर देयके निर्धारित वेळेत प्रदान करण्यास अपयशी ठरली आहे.खरे तर पेमेंट ऑफ ग्रॅज्युएटी १९७२च्या कायद्यामध्येच अशी तरतूद आहे की, नियुक्ताने ग्रॅज्युएटीची रक्कम देय झाल्यापासून ३० दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे; परंतु गेली तीन वर्षे प्रशासन यात अपयशी ठरली आहे. लोक अदालत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार ही बेस्ट उपक्रम आजपर्यंत आपला शब्द पाळू शकलेला नाही .

# मराठवाड्यात उद्योगांची पीछेहाट



मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर वगळता अन्य सात जिल्ह्यांत उद्योगांची म्हणावी तशी प्रगती नाही. दळणवळणाची साधने असतील तर कुठलाही उद्योग टिकतो. मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्ह्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मिळाले होते; परंतु या दोन्ही जिल्ह्यातही उद्योगांची पीछेहाटच आहे. आता मराठवाड्यात रोजगार मेळावे भरत आहेत. या मेळाव्यांच्या माध्यमातून कुशल कामगार तर मिळतील, परंतु मराठवाड्यात उद्योग आहेत का हा प्रश्न बेरोजगार व तरुण वर्गाला भेडसावत आहे.

मराठवाड्यात नवनवीन उद्योग आले पाहिजेत व ते टिकले पाहिजेत. या दृष्टीने हालचाली होणे गरजेचे आहे. राजकीय नेत्यांनी मनावर घेतले तर मोठ-मोठे उद्योग मराठवाड्याच्या जमिनीवर सुरू होऊ शकतात; परंतु त्या नेत्यांची उद्योजकांना मनधरणी करण्याची मानसिकता नाही की काय? असा प्रश्न मराठवाड्यातील बेरोजगार व युवा वर्ग उपस्थित करत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मराठवाड्यात सद्यस्थितीला राजकीय नेते रोजगार मिळावे भरवत आहेत. या रोजगार मेळाव्यांचा समाजाला किती फायदा होईल, ही वेगळी बाब असली तरी मराठवाड्यात उद्योग उभारणे व ते टिकविणे मोठे जिकिरीचे काम होऊन बसले आहे. दळण-वळणाच्या सुविधा असतील तर औद्योगिक वसाहतींद्वारे उद्योग टिकतात व वाढतात. यासाठी केवळ शासनाची सकारात्मक भूमिका असून चालणार नाही, त्यासाठी उद्योजकांचे प्रामाणिक प्रयत्न व मागणीप्रमाणे उद्योग असणे गरजेचे आहे. सध्या मराठवाड्याच्या बाबतीत एक आनंद वार्ता कानावर येत आहे. एका उद्योगाच्या निमित्ताने मराठवाड्याचे नशीब पालटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अमेरिकन इलेक्ट्रिक कार निर्माते यांची कंपनी टेस्ला भारतात प्रवेश करणार आहे. मार्चनंतर कंपनीचे अधिकारी भारताला भेट देणार आहेत. ही कंपनी जगप्रसिद्ध आहे. इलॉन मस्क हे प्रसिद्ध उद्योगपती या कंपनीचे सर्वेसर्वा आहेत. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर आणि गुजरात या ठिकाणी यासाठी चाचपणी झाली. टेस्ला कंपनी भारतात किमान पाच अब्ज गुंतवणूक करू शकते. टेस्ला भारतातील वेगवेगळ्या राज्यांत पाहणी करून सकारात्मक शोध घेत आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यात आजही मोठ्या उद्योगांची प्रतीक्षा आहे, त्यासाठी छत्रपती संभाजीनगरात ही कंपनी सुरू झाल्यास मराठवाड्याचे भाग्य बदलणार आहे. टेस्ला कंपनीच्या ईव्ही कारचे पार्ट भारतातील आठ कंपन्या पुरवतात. यापैकी तीन कंपन्या छत्रपती संभाजीनगरात आहेत. त्यामुळे टेस्ला कंपनीच्या छत्रपती संभाजीनगरातील गुंतवणुकीला मोठा वाव आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक होणार, असे एका कार्यक्रमात बोलले होते. त्यामुळे महाराष्ट्रात हा प्रकल्प सुरू झाला तर, तो छत्रपती संभाजीनगरात सुरू होऊ शकतो. मराठवाड्यात पूर्वी मोठ-मोठे उद्योग होते. हळूहळू या उद्योगांना उतरती कळा लागली, त्यामागील कारणे देखील तशीच आहेत. मोठमोठे कारखाने चालविणे अवघड आहे. मराठवाड्यात हळूहळू का होईना रस्ते चांगले होत आहेत. पाण्याची कमतरता भरून निघाली तर, आणखी उद्योग तग धरू शकतात. मनुष्यबळ पुरेसे आहे. निष्णांत मनुष्यबळ उपलब्ध होणे, हे देखील तसे पाहिले तर, अशक्य नाही. सध्या मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरबरोबर अन्य जिल्ह्यांतही उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण आहे. लातूर व नांदेडच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, या दोन्ही जिल्ह्यांच्या नेत्यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले; परंतू ते दोघेही नांदेड किंवा लातूरला मोठे उद्योग आणू शकले नाहीत. एकेकाळी नांदेडला असलेली टेक्सकॉम, एनटीसी मिल प्रसिद्ध होती. त्यावेळी मराठवाड्यातून संपूर्ण देशभरात मोठा व्यापार होत होता; परंतु नंतर वेगवेगळ्या कारणांमुळे मराठवाड्यातील उद्योगविश्वाला उतरती कळा लागली. आजही मराठवाड्यात असलेल्या औद्योगिक वसाहतीत अनेक उद्योग बंद अवस्थेत आहेत. अनेक उद्योजकांनी उद्योग सुरू करायचा म्हणून केवळ जमिनी लाटून घेतल्या आहेत. मराठवाड्यात उद्योग न टिकण्यामागे वेगवेगळी कारणे असली तरी खंडणीखोर, अधून-मधून वेगवेगळ्या सण-उत्सवांनिमित्त लाखो रुपयांच्या वर्गण्या मागतात. यामुळे अनेक उद्योजक त्रस्त आहेत. याशिवाय नको त्या कारणाने आरटीई टाकून पैशांची मागणी करणारेही उद्योग पळवून लावत आहेत. कोण्या एका ठिकाणी उद्योग सुरू होणार आहे, असे कळल्यावर केवळ जागा मिळावी या उद्देशातून भूखंड माफिया जागा स्वतःच्या नावावर गुंतवून ठेवतात. उद्योग सुरू करायचा नाही, जागा दडवून ठेवायची. त्या जागेला काही वर्षांनंतर चांगला भाव आला की, ती जागा चढ्या भावाने दुसऱ्याला हस्तांतरीत करायची, या पद्धतीतून अनेक भूखंड माफिया करोडोपती झाले आहेत.शासनाने अशा भामट्या उद्योजकांना हाकलून लावावे. ज्यांनी ज्यांनी उद्योगाच्या नावाखाली जमिनी लाटल्या; परंतु त्यांनी उद्योग सुरू केले नाहीत, अशा लोकांना औद्योगिक वसाहतीतून बाहेर काढावे. जे खरोखर उद्योग उभारणार आहेत, अशांनाच जमिनी द्याव्यात व उद्योग वाढीसाठी त्यांना सोयी-सवलती देऊन मोठे करावे. तसे पाहिले तर, उद्योग उभारताना जे नियम व अटी घालून दिलेले असतात, ते अनेकदा कागदोपत्री पाळले जातात, प्रत्यक्षात त्या नियमांना नंतर पाहणारे देखील कानाडोळा करतात. या व अशा अनेक कारणांमुळे मराठवाड्यात किंबहुना महाराष्ट्रात उद्योग तग धरत नाहीत. उलट मोठ-मोठे उद्योग गुजरातला पळून गेले, अशी आरोळी ठोकली जाते व त्यावरून मोठे राजकारण केले जाते. गुजरातमध्ये उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण आहे.एक खिडकी माध्यमातून गुजरातला उद्योग उभारता येतो. तशीच पद्धत महाराष्ट्रात किंबहुना मराठवाड्यात अवलंबविल्यास नक्कीच मराठवाड्याला उद्योगाच्या बाबतीत अच्छे दिन येतील, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. गुजरातमधील मोठमोठे उद्योजक परदेशात स्थायिक झालेत. त्यांनी विदेशात अब्जोवधी रुपयांचा उद्योग उभारला. परदेशात यशस्वी झालेल्या उद्योजकांमध्ये गुजरातमधील उद्योजकांची संख्या जास्त आहे. त्यामागे कारण देखील तसेच आहे. परदेशात उद्योग करत असताना कशाचीही भीती नाही. शासनाकडून परवानग्या लवकर मिळतात. उद्योग उभारायचा असेल तर कोणालाही टेबलाखालून 'अतिरिक्त' द्यायची गरज नाही. याशिवाय कुठल्याही प्रकारची भीती नसल्याने करोडो रुपयांचा व्यवहार खुलेआम होतो. तशीच पद्धत महाराष्ट्रात सुरू झाली, तर उद्योग टिकतील व ते वाढतील देखील. असो. नांदेड, बीड, परभणी, लातूर व हिंगोली या भागांत मोठे उद्योग उभारणे गरजेचे आहे. या भागांतील नेत्यांनी उद्योग वाढीसाठी लक्ष द्यावे. सध्या मराठवाड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून रोजगार मेळावे भरविले जात आहेत. त्यामधून तरुण-तरुणींना नोकरी देण्याचे आमिष दाखविले जात आहे. वर्षानुवर्षे राजकारण करणाऱ्या नेत्यांनी कारखाने उभारणीसाठी प्रयत्न केले नाहीत. आता रोजगार मेळावे भरवून केवळ दुधाची भूक ताकावर भागविण्याचा प्रयत्नचालविला आहे.केवळ जमिनी लाटणाऱ्यांची शिफारस या नेत्यांनी करू नये. ज्यांना खरोखर उद्योग उभारायचा आहे, त्यांना खरी मदत मिळणे आवश्यक आहे. किमान अशा कामांत तरी राजकारण शिरता कामा नये. मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर वगळता अन्य सात जिल्ह्यात कुठलाही मोठा उद्योग नसल्याने मराठवाड्यात बेरोजगारांचा प्रश्न उभा राहिला आहे. तो प्रश्न रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नव्हे तर उद्योग उभारून तसेच मराठवाड्यातील तरुण वर्गाला हाताला काम देऊन सोडविता येऊ शकतो, याकडे मराठवाड्यातील नेत्यांनी लक्ष देणे अत्यंतगरजेचे आहे.

# कोकणातले पावसाळी पर्यटन...

कोकणात पावसात पर्यटन स्थळांना बहर येतो. पावसाळ्यात या हिरवळीचेही एक वेगळं आकर्षण पर्यटकांना असतं. डोंगर-दऱ्यांतून वाहणारे झरे, डोंगर उतारावरचे धबधबे हे तर कोकणात जागो-जागी दिसतील. मात्र ही पर्यटनस्थळं कशा पद्धतीने विकसित करता येतील, इथे नव्याने काय करता येईल, याचा अहवालही नुकताच राज्य सरकारकडे सादर केला आहे. मात्र हा मुद्दा केवळ भाषणांपुरता मर्यादित राहू नये...



कोकणात सर्वच ऋतूंमध्ये पर्यटनासाठी मोठा वाव आहे. म्हणूनच गेल्या तीस वर्षांत कोकणातील पर्यटनस्थळं पर्यटकांच्या गर्दीने बहरलेली असतात. कोकणातल्या पालघरपासून सिंधुदुर्गपर्यंत कितीतरी म्हणजे मोजता येणार नाहीत इतकी पर्यटनस्थळं आहेत. या पर्यटनस्थळांचा पर्यटकांनी पर्यटन स्थळ करायचे ठरवले तरीही बरेच काही हातचे राहून जाईल, अशी स्थिती आहे. गोवा राज्याच्या नजीक असलेला सिंधुदुर्ग जिल्हा आणि मुंबईचा एक भाग बनून राहिलेला ठाणे, पालघर, रायगड हे जिल्हे पर्यटनासाठीही विकसित होत असले तरीही खऱ्या अर्थाने पर्यटनासाठी सर्वाधिक पसंती सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांतील पर्यटनस्थळांना आहे.

देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून १९९७ साली महाराष्ट्रातील त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. त्यानंतर कोकणातील पर्यटनस्थळ कोणती आहेत, ती कशा पद्धतीने विकसित करता येतील, यासंबंधीचा टाटा कन्सल्टन्सीकडून सर्व्हे करण्यात आला. टाटा कन्सल्टन्सीकडून कोणती पर्यटनस्थळं कशा पद्धतीने विकसित करता येतील, त्यात नव्याने काय करता येईल याचा अहवाल राज्य सरकारकडे सादर करण्यात आला; परंतु कोकणच्या दुर्दैवाने कोकणातील पर्यटन व्यवसायातून आर्थिक समृद्धी येऊ शकते, महाराष्ट्राच्या तिजोरीत मोठी भर घातली जाऊ शकते, हा आर्थिक सक्षमतेचा विचार राज्यकर्त्यांच्या भाषणांपुरता मर्यादित राहिला तो प्रत्यक्षात साकारला गेला नाही. त्यामुळे कोकणातील पर्यटन हे पर्यटकांची गरज म्हणून वेगवेगळी पर्यटनस्थळं समोर येत गेली.कोकणात पावसाळ्यातही अनेक पर्यटनस्थळं आहेत. पावसाळ्यात कोकणात सगळीकडे हिरवगार असतं. कोकणातील कोणत्याही भागात झाडेझुडपे आणि सारा परिसर हा हिरवा असतो. या हिरवळीचंही एक वेगळं आकर्षण पर्यटकांना असतं. डोंगरदऱ्यांतून वाहणारे झरे, डोंगर उतारावरचे धबधबे हे तर कोकणात जागो-जागी दिसतील. कोकणातील घाट रस्त्यांवरही आकर्षक धबधबे आहेत. म्हणूनच कोकणात पावसाळ्यातही पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात.

कोकणात नव्याने उद्योगांची चर्चा सुरू झाली तरीही कोणत्याही उद्योगाला विरोध हा ठरलेलाच असतो. मग तो उद्योग कोकणाला पूरक असो किंवा कोकणासाठी हानिकारक असला तरीही त्या चर्चेत येणाऱ्या उद्योगाला पहिला विरोध हा ठरलेलाच असतो. कोणत्याही प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांची एक मानसिकता बनून गेली आहे. यामध्ये लोकहिताचा विचार कमी आणि राजकारण अधिक अशी स्थिती आहे. विरोधासाठी विरोध या एका गोष्टीने कोकणात काही गोष्टी येऊ शकल्या नाहीत. सी वर्ल्ड सारखा कोकणाच्या पर्यटनाचं चित्र बदलू शकणारा प्रकल्प केवळ राजकारणातून होऊ शकला नाही.आज नुकसान कोकणचं झालं. एकीकडे पर्यटन विकासाच्या आणि कोकणच्या संस्कृतीच्या नावाने गळा काढणाऱ्यांनीच कोकणच्या पर्यटन प्रकल्पांना सातत्याने विरोध केला. तीस वर्षांपूर्वी ताज, ओबेरॉय सारखी हॉटेल कोकणच्या किनाऱ्यावर उभी राहणार होती; परंतु ती उभी राहू शकली नाहीत. केवळ विरोधामुळेच कोकणात आज जे काही पर्यटक येतात त्यांची संख्या आणखी दुपटीने वाढली असती; परंतु अनेक प्रकल्प येण्यापासून विरोधामुळे येऊ शकले नाहीत. आता कोकणात नव्याने उद्योजक फार कोणी यायला उत्सुक नाहीत. यामुळे नव्याने कोणताही प्रकल्प येत नाही, काही होत नाही. काही होण्यापूर्वीच जो होणारा विरोध आहे या विरोधाचा एक मोठा परिणाम उद्योगक्षेत्रावर झाला आहे. कोकण म्हटलं की, नको रे बाबा असंच काहीसं नकारात्मक असलेलं वातावरण बदलावं लागेल. त्यासाठी निश्चितच काही कालावधी जावू द्यावा लागेल. कोकणात कोणताही उद्योग येण्यासाठी जनतेनेही सकारात्मक मानसिकता तयार केली पाहिजे. शंका-कुशंकानी आपले आजवर फार मोठे नुकसान झाले. याचा विचार राजकारणी करणार नाहीत. तो विचार आपणच करायला हवा. पर्यटन प्रकल्पांच्या बाबतीतही सरकारकडून काही निर्णय झाले पाहिजेत.

कोकणातील पुरातन मंदिर, कातळशिल्प अशा कितीतरी वेगळ्या गोष्टीतून पर्यटन वाढू शकत. रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे यांनी १९९७ साली सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पर्यटन क्षेत्र विकसित करण्याच्या कामाला आजही अधिक गती मिळाली पाहिजे. कोकणात पर्यटन स्थळांकडे जाणारे अरुंद रस्ते ही फार मोठी समस्या आहे. अर्धा फूट जागा देण्याची आजही मानसिकता नाही. या अशा बदलांशिवाय पर्यटन प्रकल्पही मार्गी लागणार नाहीत आणि पर्यटन व्यवसाय देखील वाढणार नाही. त्यामुळे कोकणामध्ये पर्यटन व्यवसायाला मोठा वाव आहे.

गोव्याला पर्यटक मोठ्या प्रमाणावर जातात; परंतु कसीनो, दारू याची असणारी सहजची उपलब्धता यामुळे साहजिकच पर्यटकांचा ओघ गोव्याकडे अधिक राहातो; परंतु गेल्या काही वर्षांतील गोव्यातील बदलत गेलेल्या वातावरणाचा परिणामही पर्यटन व्यवसायावर झालेला दिसतो. यामुळे साहजिकच गोवा राज्यातील एकूणच वातावरणात गुदमरलेला पर्यटक कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्गात पर्यटनासाठी येताना दिसतो. विशेषकरून कोकणच्या किनारपट्टीवरही मोठ्या संख्येने देशी-परदेशी पर्यटक येताना दिसतात. पर्यटन क्षेत्रातही नवनवीन बदल घडत आहेत. पूर्वी फक्त समुद्रकिनाऱ्यांवर फिरणारा पर्यटक होता. पावसाळ्यात डोंगर-दऱ्यांतून वाहणारे झरे आणि धबधबे यांचा आनंद घेणारा पर्यटक, गजबजलेल्या शहरी भागातून रोजच्या धकाधकीच्या जीवनपद्धती, धावपळ याला कंटाळलेला एक वर्ग समाजात आहे. अशांना गाव-खेड्यातील साध्या कौलारू घरातून राहायला आवडतं, कोकणात निवास-न्याहरीसारख्या योजनांमधून पर्यटन व्यवसायात 'निवास-न्याहरी'ची संकल्पना पुढे आली. यातून ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना रोजगाराची एक नवी संधी प्राप्त झाली. अलीकडे तर कोकणात येणाऱ्या पर्यटकाला शेतीच्या कामातूनही आनंद घ्यायला आवडतो. भातशेतीत काम करत शेतातल्या जेवणाचा, नाश्ताचा आनंद घेणारेही पर्यटक आहेत. शेतीतून आनंद घेणारे पर्यटक शेती कामाच्या पर्यटन व्यवसायातही काही शेतकरी कुटुंब पर्यटन व्यवसाय म्हणून पुढे येत आहेत.

कोकणातील पर्यटन व्यवसायात अशा अनेक पद्धतीने बदल घडत आहे. या सर्व बदलाचा सकारात्मक परिणाम पर्यटन व्यवसायावर होताना दिसतो. कोकणच्या पर्यटन व्यवसायात नजीकच्या काळात जी बंदरे विकसित होतील त्या विकसित होणाऱ्या बंदरांमध्येही पर्यटनस्थळ विकसित होतील. येथील पर्यटकांना अधिकाधिक आकर्षित करतील, खिळवून ठेवतील अशी अनेक पर्यटनस्थळं आहेत. त्या पर्यटनस्थळांचे मार्केटिंग आपणच करायला हवं. कोकणातील काही ठरावीकच पर्यटनस्थळांची जर चर्चा होत असेल तर अन्य पर्यटनस्थळं चर्चेत येण्यासाठी त्या-त्या पातळीवर अगदी गावपातळीवरून प्रयत्न करायला हवे. शासनस्तरावर जेव्हा काही व्हायचं असेल ते होईलच; परंतु तत्पूर्वी गावपातळीवर आपणच यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, तरच कोकणातील पर्यटन आणखी बहरेल, वाढेल एवढं निश्चित!

## कुरेशी समाजाचा जनावरांच्या बाजारावर बहिष्कार!

# साळेगावच्या जनावरांच्या आठवडी बाजाराची अर्थव्यवस्था कोलमडली

## शेतकऱ्यांसह अनेक व्यावसायिज्यांच्या धंद्यावर आली संक्रांत

आम्ही अनेक वर्षा पासून आठवडी बाजारात ओला चारा आणि वैरण विक्री करीत आहोत मात्र आता ग्राहक कमी झाले असल्याने शेतकऱ्याकडून चारा विकत घेणे आम्हाला शक्य नाही.
–दत्तू गित्ते, चारा व्यापारी

जनावरे विक्री झाल्या नंतर कुटुंबासाठी आणि लहान मुलांसाठी खाऊ घेऊन जातात. आता शेतकरी ग्राहक कमी झाले आहेत.
–दिलीप मेडकर ,शेव, भजी, जिलेबी विक्रेते

माझ्या आजी आजोबा पासून आमचा साळेगावच्या आठवडी बाजारात मटण खानावळीचा ६० वर्षापासूनचा धंदा आहे. बाजारला येणारे शेतकरी हमखास जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी हॉटेलात येतात. परंतु आता ग्राहक घटले असल्याने आमच्या धंद्यावर परिणाम जाणवू लागला आहे.
–बालाजी नन्नवरे,मटण खानावळ

आम्ही दर आठवड्याला बाजारात चहा पाण्याचे हॉटेल चालवित असतो. पण सद्य ग्राहक खूप कमी झालेले आहेत.
–धनंजय गालफाडे, चहा विक्रेते

बाजारात शेतकरी आले तर आमची विक्री होईल आणि त्यांचे जनावरे विकले तर त्यांच्या हातात पैसे येतील आणि मग आमचे चप्पल बुट विकतील. पण आता सर्व व्यवहारच बिघडला आहे.
–नागेश राऊत,पादत्राणे विक्रेते

बाजारात येणारे ग्राहक आणि शेतकरी कमी झाल्याने भाजीपाला विक्रीवर त्याचा परिणाम झाला आहे.
–भारत राऊत,भाजीपाला विक्रेते

आम्ही पादत्राणे दुरुस्ती आणि छत्र्या दुरुस्तीची कामे करून आमची व कुटुंबाची पोट भरीत आलेलो आहोत. बाजाराला येणारे सामान्य शेतकरी व मजूर यांच्यावर आमची उपजीविका चालते. आता तेच घटले तर आमचा धंदा कसा होणार?
–विश्वनाथ राऊत,छत्री व पादत्राणे दुरुस्ती



**केज । गौतम बचुटे**

गोरक्षक आणि जाचक नियमामुळे होत असलेला त्रास याला वैतागून कुरेशी समाजाने जनावरांची खरेदी-विक्री बंद करण्याचा घेतलेला निर्णयामुळे फक्त शेतकरीच अडचणीत आलेला नाही तर त्यामुळे बाजारावर पोट असलेल्या सामान्य छोट्या व्यावसायिकांचे अर्थशास्त्र बिघडून गेले असल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची भीती व्यक्त होत आहे. तसेच ग्राम पंचायतीचे देखील उत्पन्न घटले आहे.

गोवंश हत्याबंदीच्या निर्णयामुळे आणि त्याच बरोबर शासनाच्या पशु वाहतूक व इतर जाचक अटीमुळे कुरेशी समाजाने गाय, बैल, म्हशी व इतर जनावरांची खरेदी विक्री करण्यावर बहिष्कार टाकलेला आहे. त्यामुळे आता बिनकामाच्या जनावरांचे काय करायचे ? असा प्रश्न शेतकऱ्याना पडलेला आहेत. त्यातच चारा, पेंड, सुग्रास यांचे भाव वाढलेले असून जनावरांना चरण्यासाठी गावरान आणि पडीक जमीनीचे क्षेत्र देखील कमी झाल्याने शेतकऱ्यांना अशी जनावरे सांभाळणे परवडत नाही. तसेच पेरणी, बी बियाणे, लग्न आणि घरातील अडीअडचणी प्रसंगी शेतकरी त्यांच्याकडचे जनावरे विकून प्रपंच आणि घरातील अडीअडचणी भागवीत असतो. त्यामुळे आता जनावरांची खरेदी विक्रीच बंद झाल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे पशुपालक शेतकरी वर्गावर संकट आलेले आहे.

बीड जिल्ह्यातील साळेगाव ता. केज येथे दर गुरुवारी भरणाऱ्या बैल बाजारावर याचा खूप मोठा परिणाम झाला आहे. कुरेशी समाजाच्या जनावरांच्या खरेदी-विक्रीवरील बहिष्कारामुळे जनावरांची खरेदी-विक्रीचे सर्व व्यवहार ठप्प झाले असल्याने त्यातून मिळणारे ग्रामपंचायतीचे उत्पन्न, वैरण व चारा विक्रेते, चहा, फराळ, मटण व जेवणाच्या खानावळी, भाजीपाला विक्रेते, कपडे, चप्पल बुट विक्रेते, तसेच आठवडी बाजारात जनावरांचे दावे दोरखंड आणि त्यांचा सजावटीचे साहित्य विक्रेत्या सोबच आठवडी बाजारात मोलमजुरी करणाऱ्या मजूर वर्गावर त्याचा परिणाम व्हायला सुरुवात झाली असून त्याची उपासमार होण्याची देखील शक्यता निर्माण होण्याचा धोका आहे.

**आता एक महिन्यावर बैल पोळ्याचा सण आल्याने शेतकरी घुंगर माळा, सर, म्होरक्या, शेंब्या, कासरे, झुली असा साज यांची विक्री कमी झाल्याने आम्ही खरेदी केलेल्या मालाचे काय करावे असा प्रश्न आम्हाला भेडसावत आहे.**
**–भिमराव राजगिरे ,लक्ष्मण राजगिरे**

दर गुरुवारी आमच्या आठवडी बाजारात सुमारे ४०० ते ५०० जनावरांची खरेदी विक्री होत असते त्यातून सुमारे दोन ते अडीच कोटी रु. ची उलाढाल होते. ग्रामपंचायतीला जनावरांच्या खरेदी-विक्री च्या दाखल्यापोटी सुमारे ४० ते ५० हजार रु. उत्पन्न जमा होते. परंतु आता आमच्या उत्पन्नात घट झाल्याने त्याचा परिणाम गावच्या विकास कामावर देखील होईल.
–कैलास जाधव पाटील,सरपंच, साळेगाव

आमचा बहिष्कार हा शेतकऱ्यांना नसून सरकारच्या जाचक अटी विरुद्ध आमचा हा बहिष्कार आहे. जो पर्यंत यावर सरकार निर्णय घेत नाही. तो पर्यंत आमचा हा लढा सुरूच राहील.
–असरार कुरेशी, कुरेशी संघटना, केज

आठवडी बाजारात आमच्यासारखे धंदा करणारे अनेक व्यापारी आहेत. परंतु जनावरांची खरेदी विक्री कमी झाल्याने आमच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे.
–शेषेराव गित्ते,दावे दोरखंड विक्रेते

मागील पन्नास वर्षा पासून मी जनावरांचा व्यापार करीत आहे. मात्र या बहिष्कारामुळे आमच्या सुद्धा व्यापारावर त्याचा परिणाम झालेला आहे. कारण भाकड आणि वृध व बिगर कामाची जनावरे विकून शेतकरी दुभती व मशागतीसाठी बैल खरेदी करीत असतात. मात्र आता शेतकरीच अडचणीत आला आहे तर आमच्या कडच्या बैल आणि दुभत्या जनावरांना गिऱ्हाईक कमी झाले आहे.
–सोमनाथ पटणे,बैल, गाय व्यापारी

कुरेशी समाजाच्या बहिष्कारा बाबत सरकारने योग्य भूमिका घेऊन हा तिढा सोडवावा.
–युवराज पारखे, चहा विक्रेते

---

## राष्ट्रवादीच्या मेळाव्यांतून बळीराम गवतेंच्या पंखात भरले बळ

# राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्याकडून बळीराम गवतेंवर युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी,ना.अजित पवारांनीही केले होते कौतूक

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी मागील काही महिन्यांपुर्वी 'युवा संवाद' कार्यक्रमातून बळीराम गवते यांच्या जनसंपर्काचे जाहिर कौतूक केले होते तर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या कामाची दखल घेत दि.२० जुलै रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करून एकप्रकारे राजकिय बळच त्यांच्या पंखात भरले आहे.

बळीराम गवते हे ग्रामीण भागातून पुढे आलेले युवा नेतृत्व असून त्यांनी बीड पंचायत समितीच्या माध्यमातून मतदारसंघात स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.पंचायत समितीच्या माध्यमातून सामान्य नागरिकांचे कामे करताना त्यांनी जनसंपर्क वाढविला. याच कामाचे मुल्यमापन पक्षाकडून होत असून राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बळीराम गवते यांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सकाळी ९ वाजता युवा संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यास अफाट गर्दी पाहून अजित पवार यांनी सलग तासभर युवकांशी संवाद साधला होता. यावेळी बळीराम गवतेंच्या जनसंपर्काबाबत आणि तरूणांना सोबत घेवून चालण्याच्या पध्दतीबद्दल कौतूक केले होते. याच कार्यक्रमामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी येऊ शकते, अशी चर्चा सुरू झाली होती. यानंतर दि.२० जुलै रोजी पुन्हा याच



ठिकाणी 'निर्धार नवपर्वाचा, पदाधिकारी सवांद मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, पक्षाचे नेते आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, महिला आघाडीच्या नेत्या रूपालीताई चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार आजबे काका, माजी आमदार संजय दौंड, रमेशराव आडसकर साहेब,जयसिंग भैय्या सोळंके, योगेश भैय्या क्षीरसागर, राजकिशोर मोदी, अरुण भाई इनामदार, महेश अण्णा दाभाडे, प्रज्ञाताई खोसरे. यांच्या उपस्थितीत गवतेंवर युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यत आली. यामुळे बळीराम गवते यांच्या पंखात पक्षाकडून बळ भरले जात आहे.

### बळीराजा निवासस्थानी खा.तटकरेंची भेट

**निर्धार नवपर्वाचा पदाधिकारी संवाद मेळाव्याच्या पुर्वसंध्येला प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या 'बळीराजा' निवासस्थानी भेट दिली. यावेळी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आ.धनंजय मुंडे, जेष्ठ नेते अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण यांची उपस्थिती होती. या भेटीने मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**

### मतदारसंघात जल्लोष, वाटले पेढे, फोडले फटाके

**राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकर यांनी निर्धार नवपर्वाचा, पदाधिकारी संवाद मेळाव्यात बळीराम गवते यांची युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केल्यानंतर अवघ्या काहीच वेळात मतदारसंघात आणि जिल्हाभरात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. शहरातील माने कॉप्लेक्स या भागात दिवाळीच साजरी करण्यात आली. ग्रामीण भागात पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केल्याचे दिसून आले.**

---

# मुरूडमध्ये बजरंग दलाचा अभ्यासवर्ग उत्साहात संपन्न



**रायगड । प्रतिनिधी**

मुरूड येथे बजरंग दलाचा दोन दिवसीय अभ्यासवर्ग हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या परिसरात उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडला. विभाग सहमंत्री ॲड. अनिकेत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभ्यासवर्गात कार्यकर्त्यांमध्ये विचारशुद्धता, राष्ट्रनिष्ठा आणि संस्कारक्षम नेतृत्व विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला.

या वर्गात मुक्त चिंतन, शिस्त व संघभावना वाढवण्यासाठी विविध मैदानी खेळ, तसेच वैचारिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी जिल्हा मंत्री जितेंद्र करंजकर, उपाध्यक्ष संतोष भोईर, संयोजक किरण कानडे, अध्यक्ष दिलीप जोशी यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील अनेक युवकांनी या वर्गात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. वर्गाच्या माध्यमातून त्यांनी देश, धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी नवचैतन्य व प्रेरणा मिळवली असल्याचे सांगण्यात आले. वर्गाची सांगता राष्ट्रगीत आणि प्रेरणादायी भाषणांद्वारे झाली.

---

# पनवेल वाहतूक शाखेतून शाळेच्या बस चालकांना वाहतुकीच्या नियमाबाबत जनजागृती

**पनवेल । प्रतिनिधी**

वाहतुकीच्या नियमाबाबत शालेय बस चालकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने पनवेल वाहतूक शाखेच्या हद्दीतील वाहतूक नियमानबाबत मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय पाटील यांनी बस चालक व मुख्याध्यापक यांना वाहतूक नियमांबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन, अपघातांच्या घटनात वाढ होताना दिसून येत आहे अनेक वाहन चालकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्यामुळे अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे म्हणून वाहतूक नियमांबाबत जनजागृती झाल्यास शिस्तप्रिय चालकाची संकल्पना स्पष्ट होईल. यामध्ये शाळेच्या गेटच्या दोन्ही बाजूस सीसीटीव्ही



लावणे, स्कूल व्हॅन साठी ग्राउंड वर पार्किंग उपलब्ध करणे , स्कूल व्हॅन ना कुठे जाता-येतात त्याचप्रमाणे नंबर देण्याची व लांबचे विद्यार्थी यांना लवकरात लवकर जाण्याची सुविधा करण्याचे सूचना दिली. त्याचबरोबर शाळेच्या गेट व रस्त्यावर तुमचे वॉचमन शिक्षक झ.ढ शिक्षक ठेवणे, वाहनाची कागदपत्रे अद्यावत असावीत, वाहन चालकाने बॅच लावावा तो कुठून व कोणत्या विद्यार्थ्यांची वाहतूक करतो याबाबत शाळेने माहिती ठेवावी, शाळेचा वेळ आपसात मीटिंग करून ठरवून घ्यावे जेणेकरून रस्त्यावर वाहतुकीला अडथळा होणार नाही. या जनजागृतीपर विशेष कार्यक्रमात पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय पाटील यांनी वाहतुकीच्या नियमाचे महत्त्व पटवून देतानाच अपघात कसे घडतात आणि अपघात कसे टाळता येऊ शकतात याचे मार्गदर्शन केले तसेच आपण स्वतः इतरांनी वाहतुकीचे नियम कसे पाळावेत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले यावेळी पनवेल वाहतूक शाखा तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शालेय वाहन चालक तसेच संपूर्ण स्टाफ कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

---

# बँक ऑफ बडोदा बनली 'निक्षय मित्र'; २० क्षयरुग्णांना घेतले दत्तक

**रायगड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात बँक ऑफ बडोदाने आपला मोलाचा सहभाग नोंदवित २० क्षयरुग्णांना दत्तक घेतले आहे. या रुग्णांना नियमित पोषण आहार पुरवून त्यांच्या आरोग्य सुधारणेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची जबाबदारी बँकेने स्वीकारली आहे. बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेच्या दिवशी, अलिबाग, रेवदंडा व चणेरा शाखांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक घेतलेल्या क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याआधी सर्व बँक, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र व अधिकारी वर्गांना 'निक्षय मित्र' होण्याचे आवाहन केले होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत बँक ऑफ बडोदा ही 'निक्षय



मित्र' बनली.दरवर्षी रायगड जिल्ह्यात सरासरी ४ हजार ५०० क्षयरुग्ण आढळतात. त्यांच्यावर प्रभावी उपचारासोबत पोषण आहाराचा पुरवठा झाल्यास उपचार अधिक यशस्वी होतात, हे लक्षात घेऊन जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत 'निक्षय मित्र' उपक्रम राबविला जात आहे.या उपक्रमाच्या वितरण सोहळ्याला बँक ऑफ बडोदा अलिबाग शाखेचे व्यवस्थापक श्री. चैतन्य मुड, चणेरा शाखेचे व्यवस्थापक श्री. शशिकांत चौगुले, रेवदंडा शाखेचे व्यवस्थापक श्री. श्रीकृष्ण खंदारे, तसेच जिल्हा क्षयरोग केंद्राचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.'निक्षय मित्र' उपक्रमातून दानशूर संस्था, कंपन्या व व्यक्तींनी पुढाकार घेतल्यास क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने समाज एक पाऊल पुढे टाकू शकतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.जिल्ह्यातील इतर संस्था, बँका व नागरिकांनीही पुढे येऊन या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्षयरोग केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षणमहर्षी शामराव गदळेंनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली-नंदकिशोर मुंदडा

## दहिफळ वड.येथील शाम गदळे विद्यालयात पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, गुणवंतांचा सत्कार

**केज । प्रतिनिधी**

शिक्षणमहर्षी शामराव गदळे गुरुजींनी अथक परिश्रम करून वडमाऊली विद्याप्रसारक मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली. या संस्थेतून शिकलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत. गदळे गुरुजींच्या शिक्षण क्षेत्रातील वारशाचे जतन त्यांचे सुपुत्र इंजि.शरद गदळे व डॉ शशिकांत दहिफळकर खंबीरपणे करत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले.गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडमाऊली विद्याप्रसारक मंडळ संचलित दहिफळ वडमाऊली येथील श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा गुरुवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नंदकिशोर मुंदडा बोलत होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सखाहरी गदळे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. वासुदेव नेहरकर, मुरलीधर ढाकणे, विजयकांत मुंडे, जालिंदर मोराळे, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, संस्थेचे अध्यक्ष शशिकांत दहीफळकर, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष राहुल गदळे, इंजि. शरद गदळे, बालासाहेब मोराळे, डॉ.धनराज पवार, संदीपान आंधळे, नामदेव आंधळे, समिरसिंह देशमुख, अशोक गायकवाड, नामदेव गायकवाड, काकासाहेब पाळवदे, डॉ.सुग्रीव ढाकणे, बाबासाहेब कोरडे, अशोक वाघमारे, सचिन गायकवाड, दीपक काळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या गुणवत्तेसह उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. शरद गदळे यांनी केले त्यांनी आपल्या दमदार भाषण शैली ने सर्वांची मने जिंकली व पुढील वाटचालीची दिशा दाखवली . सूत्रसंचलन बी. एस. मुंडे यांनी केले, तर आभार डॉ.शशिकांत दहीफळकर यांनी मानले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील गावांचे आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित मंडळी, गुणवंत विद्यार्थी, शाळेचे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शासकीय सेवेत रुजू झालेल्या माजी विद्यार्थी, पालक, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या जयश्री गदळे, सरपंच अनिता गदळे, जयदत्त गदळे यांनी केले होते.

### २०० रोपट्यांचे वृक्षारोपण होणार-इंजि.शरद गदळे

**वडमाऊली विद्याप्रसारक मंडळाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जातात. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गुणवंत विद्यार्थी व शासकीय सेवेत रुजू झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी २०० रोपट्यांचे वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याची ग्वाही संस्थेचे सचिव इंजि. शरद गदळे यांनी दिली.**



### 'राम फटाले' यांच्या कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचाची सांत्वन भेट

# सावकारांना कठोर शासन व्हावे बीड शहर बचाव मंचाची कुटुंबीयांच्या वतीने मागणी

**बीड । प्रतिनिधी**

सावकारीच्या महाभयानक अत्याचारातून अनेक वर्ष होरपळून निघत असलेल्या सर्व फटाले कुटुंबीयांची बीड शहर बचाव मंचाने काल भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी मयत झालेले राम फटाले यांचे मोठे चुलते बीड शहरांतुन अनेक वर्षांपासून प्रदीर्घ पत्रकारितेचे काम केलेले ज्येष्ठ पत्रकार द्वारकादास फटाले हेही आवर्जून उपस्थित होते. यावेळी गेल्या अनेक वर्षापासून पेठ,बीड टकारवाडा भागातील महाभयानक , क्रूरतेचा कळस असलेल्यां व महा अत्याचारी सावकार कुटुंबीयांच्या जाळ्यात कशा पद्धतीने अडकत गेलोत व त्यांनी अनेक वर्षांपासून कशा पद्धतीने शोषण केले, अनेक वेळेस राम फटाले यांना व्याजाच्या पैशापोटी दिवस दिवस घरात कोंडून ठेवून मारहाण करत राहिले हा सगळा घडलेला प्रकार त्यांचे वडील, चुलते व भाऊ यांनी सविस्तर सांगितला.





२०२१ -२२ च्या लॉकडाऊन काळातही या क्रूर सावकाराला मुद्दल व्याजासह सह पैशाची परतफेड करूनही तारण ठेवलेले चेक, बॉण्ड्स इतर कागदपत्रे हा परत देत नव्हता व आज पर्यंत परत दिलेली नाहीत. सतत व्याजाच्या पैशासाठी राम फाटले यांच्या घरातील महिलांना शिवीगाळ करणे घाणेरड्या अर्वाच्च भाषेमध्ये क्रूरपणे नाही नाही त्या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या धमक्या देणे , आपण इथे लिहू शकणार नाही असे शब्द वापरून सतत उत्पिडन चालू होते. गेल्या सात वर्षांपासून चाललेल्या ह्या अत्याचारीत जीवनाला कंटाळून राम फाटले यांनी आपली जीवन यात्रा आत्महत्या करून संपवली. यावेळी फटाले कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचाने आम्ही तुमच्या पाठीशी तुम्हाला न्याय मिळेल पर्यंत खंबीरपणे उभे आहोत,अशी भूमिका मांडली. बीड शहर बचाव मंचाचे कायदेशीर सल्लागार ड.अनिल बारगजे यांनी या कुटुंबीयांचे वकीलपत्र एक रुपया न घेता स्वखर्चाने स्वीकारले आहे. कुटुंबीयांना न्याय मिळेपर्यंत बीड शहर बचाव मंच त्यांच्यासोबत उभे आहे असे सर्व पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तरी पोलीस विभागाने याचा सखोल व योग्य पद्धतीने तपास करावा कुठल्याही मोठ्या नेत्यां पुढार्यांनी मताच्या राजकारणासाठी आजवर केल्याप्रमाणे आता याला पाठीशी घालू नये अशी मागणी फटाले कुटुंबीयांच्या वतीने यावेळी उपस्थित असलेले बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, बचाव मंचचे मार्गदर्शक सुधीर देशमुख, संपादक बालाजी जगतकर आदी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# हनी ट्रॅप,पेनड्राईव्ह या सर्व शिळ्या भाकरी-मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भाजप नेते तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हनी ट्रॅपच्या मुद्यावरून सरकारवर चौफेर टीका करणाऱ्या विरोधकांवर जोरदार पलटवार केला आहे. हनी ट्रॅप व पेन ड्राईव्ह या सर्व शिळ्या भाकरी आहेत. विरोधक मीडियातील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी वाढवून, चढवून बोलतात, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांना आपली उंची पाहून बोलण्याचाही उपरोधिक सल्ला दिला. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावरही निशाणा साधला.



चंद्रशेखर बावनकुळे मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांची सर्व दुकाने बंद केली आहेत. यामुळे संजय राऊत यांचा त्यांच्यावर राग आहे. त्यांनी बोलणे बंद केले असे तर उद्धव ठाकरे यांच्या काही जागा वाढल्या असत्या. त्यांच्या अनावश्यक बोलण्यामुळेच उद्धव ठाकरे यांच्या जागा कमी झाल्या. मोदींना आता २०२९ पर्यंत जनमत मिळाले आहे. त्यामुळे संजय राऊत यांनीच आता कुणाला नेता मानायचे हे ठरवावे. त्यांना भाजप व आमच्या राष्ट्रीय नेत्यांत लुडबूड करण्याचा अधिकार नाही. मोदी समर्थ आहेत. सक्षम आहेत. त्यांना केव्हा निवृत्ती घ्यायची हे कळते. यापूर्वी अनेक नेत्यांनी वयाच्या ८० ते ८२ व्या वर्षापर्यंत काम केले आहे.चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हनी ट्रॅपविषयी केलेले आरोपही फेटाळून लावले. ते म्हणाले, हनी ट्रॅप व पेनड्राईव्ह या सर्व शिळया भाकरी आहेत. मीडियातील स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी विरोधक वाढवून चढवून बोलतात. त्यांचे आरोप ५ वर्षे जुने आहेत. सध्या २०२५ सुरू आहे. विरोधकांकडे दुसरे कोणतेही मुद्दे नाहीत. महाविकास आघाडीत प्रचंड वाद आहेत. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सुद्धा त्यांची तोंडे वेगवेगळ्या दिशेला होती. त्यांना एकत्र पत्रकार परिषद घेता आली असती, पण ते त्यावेळीही एकत्र दिसले नाहीत. विरोधकांत कोणताही समन्वय नाही. त्यानंतरही ते विरोधी पक्षनेता निवडण्याची मागणी आहे. ते आपसातच भांडत आहेत.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडला सफाई कामगारांच्या हक्कांचा मुद्दा



**मुल । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सफाई कामगारांच्या (लाड पागे समिती) अंमलबजावणीसंदर्भातील प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने तात्काळ निर्णय घेऊन हे प्रश्न निकाली काढावेत, असा ठोस आग्रह महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा माजी चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत धरला.दिनांक २२ जुलै २०२५ रोजी, शासकीय विश्रामगृह, मुल येथे अखिल भारतीय सफाई मजदूर कामगार संघटना, महाराष्ट्र प्रदेश (रजि. नं. ७२६२), तालुका शाखा मुलच्यावतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सफाई कामगारांच्या हक्कांसाठी प्रांजळपणे आवाज उठवल्याबद्दल संघटनेने त्यांचे आभार मानले.

या प्रसंगी तालुका अध्यक्ष सदिप पारचे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी सजय मोगरे, दिनेश रगडे, महेंद्र राणे, सविता बघेल, बादल महानंदे, अरविंद सोनटक्के, साईनाथ शेंद्रे, राहुल मोगरे, रक्षाताई सांडे, बबलू मोगरे, इंद्रजीत मेश्राम व अनेक सफाई कर्मचारी उपस्थित होते. सुधीर मुनगंटीवार यांनी सफाई कामगारांचे सामाजिक सन्मान, स्थायीत्व व सुरक्षितता यांचा मुद्दा विधानसभेच्या पटलावर ठेवत तातडीने निर्णय घेण्याचे आदेश संबंधित विभागाला दिल्याने राज्यभरातील सफाई कामगारांत समाधानाचे वातावरण आहे.

# बुद्ध आणि त्यांचा धम्मग्रंथाचे वाचन करून तथागताच्या उपदेशानुसार जीवनात आचरण करणे हे गरजेचे आहे

## धम्मदीप बुद्धविहाराच्या वतीने बालाजी जगतकर यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

तथागत गौतम बुद्धांच्या काळात आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमेपर्यंत वर्षा काळात भिकू संघ विहारात राहून परिसरातील जनतेला तथागतांचा उपदेशांचे महत्व व त्यानुसार जीवनातील आचरण किती महत्वाचे आहे हे आपल्या धामदेशातून सांगत असत. त्या तीन महिन्याच्या पर्वाला वर्षावास असे म्हणतात



पूज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली भिकू धमशील थेरो यांनी बीड जिल्ह्यात प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात धम्ममय वातावरण तयार केले आहे. व धम्मप्रसार व प्रचाराची कार्य अत्यंत जोमाने पार त्यांच्याच मार्गदर्शनाखाली अनेक विहारात यावर्षीच्या वर्षावास काळात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे नियमित वाचन आषाढ पौर्णिमे पासून सुरू आहे. त्याचा बहुसंख्य उपासक उपासिका बालक बालिका लाभ घेत आहे. व आपले जीवनात आपल्या जीवनात त्रिसरण पंचशील,अर्य अष्टागिकमार्ग व दहा परिमितीचे पालन दुःखमुक्ती करता कसे गरजेचे आहे. माणसाने माणसाशी माणसाशी कसे वागणे कसे वागावे महत्वाची आहे ते समजावून घेत आहे. प्रत्येक विहारी ही संस्कार केंद्रे व्हावीत तेथील कामकाज कसे चालते हे अवलोकनासाठी प्रथम धम्मदीप बुद्ध येथील विहारात शिवाजीनगर बलभीम नगर परिसर बीड येथे भेट दिली असता विहारात प्रतिमेला तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला व आदर्शांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्रिशरण पंचशील ग्रहण केल्यानंतर धम्म बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचनअँड. तेजस सोडणारे यांनी केले. अत्यंत आकर्षक बांधलेल्या बुद्ध विहारास प्रथम भेट दिल्यामुळे दैनिक वादळ वार्ताचे कार्यकारी संपादक व अखिल भारतीय लघु व माध्यम वृत्तपत्र संघटनेच्या बीड जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल विहार कमिटीच्या वतीने अध्यक्ष अँड.तेजस वडमारे यांनी पुष्पमाला पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला. याप्रसंगी शहरातील प्रत्येक विहारास भेट देऊन तेथील अडीअडचणी समजून घेण्याचे त्या कशा सोडवता येतील त्याचे दैनिक वादळ वार्ता तर्फे आश्वासन दिले. संपन्न होत असलेल्या विविध कार्यक्रमाबद्दल , महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल ग्रुपच्या समाधान व्यक्त केले. पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी या कार्यक्रमास भागातील उपासक माहामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी.जे. वानखेडे, एस.एस.सोनवणे,बी.जी दळवी,प्रशांत वासनिक नितेश उपाध्ये,अंजली वडमारे,अशाबाई भालेराव, स्वाती वडमारे,आचल वडमारे, रमाबाई सोनवणे, असंख्य महिला व पुरुष बालक बालिकाची उपस्थिती होती.

# नागपूर -नागभीड ब्रॉड गेज मार्ग लवकर पूर्ण दिवाळीपूर्वी लोकार्पण-परिवहन मंत्री सरनाईक

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नागपूर ते नागभीड हा १०६ किलोमीटरचा नॅरो गेज लोहमार्ग ब्रॉड गेज मध्ये रुपांतरीत करण्याचे काम गतीने पूर्ण होत असुन, दिवाळीपूर्वी ईतवारी रेल्वे स्थानक (जंक्शन) ते उमरेड या ५१ किमी मार्गाची लोकार्पण होईल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ते मंत्रालयात बोलावलेल्या महारेल कार्पोरेशनच्या कामाच्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते. या बैठकीला महारेल कार्पोरेशनचे उपाध्यक्ष जैस्वाल, परिवहन विभागाचे उपसचिव किरण होळकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले , नागपूर जवळील ईतवारी रेल्वे स्थानक (जंक्शन) ते उमरेड स्थानकापासून नागभीड पर्यंत सुमारे १०६ किलोमीटरचा नॅरो गेज लोहमार्ग ब्रॉड गेज मध्ये रूपांतरित करण्याचे काम लवकरच पूर्ण करण्याचे निर्देश महारेल कार्पोरेशनला दिले आहेत. त्यापैकी इतवारी ते उमरेड या ५१ किलोमीटरच्या लोहमार्गाचे लोकार्पण दिवाळीपूर्वी करण्याच्या सूना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, या लोहमार्गाच्या नुतनीकरणामुळे १२-१४ छोट्या मोठ्या गावांना लोहमार्गाने नागपूर सारख्या महानगराशी जोडता येईल. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

सन. २०१६ मध्ये महाराष्ट्र शासन व केंद्रीय रेल्वे मंत्रालय यांच्या संयुक्त भागीदारीतून महारेल कार्पोरेशन या संस्थेची स्थापना केली आहे. महाराष्ट्रातील ज्या रेल्वे प्रकल्पामध्ये राज्य शासनची आर्थिक भागीदारी आहे, ते रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी महारेल कार्पोरेशन वर आहे. तसेच सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारत असलेला रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र हा प्रकल्प म्हणजे महाराष्ट्रातील सर्व रेल्वे फाटका चे रूपांतर रेल्वे उड्डाणपूल मध्ये करण्याची मोठी जबाबदारी महारेल कार्पोरेशन वर टाकण्यात आली आहे. हे रेल्वे उड्डाणपूल देखील गतीने पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री सरनाईक यांनी महारेल कार्पोरेशनला दिल्या.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077